## रतन टाटा यांच्या स्मृतिदिनानिमित्त श्वानांसाठी लसीकरण

*पिंपरी :* स्वर्गीय रतन टाटा यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्राणिप्रेमाचा वारसा जपत टाटा मोटर्स विंगर परिवार आणि आधार समाजसेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भटक्या व पाळीव श्वानांसाठी मोफत लसीकरण मोहीम राबविण्यात आली. इंद्रायणीनगर येथील सर्कल चौक तसेच पांजरपोळ येथील डॉक्टर्स डिव्हाईन कर्म व्हेटर्नरी पॉलिक्लिनिक येथे हा उपक्रम झाला. पहिल्याच दिवशी ७० भटक्या आणि ३५ पाळीव श्वानांची तपासणी व लसीकरण करण्यात आले. डॉ. दत्तात्रेय कांबळे आणि अभिजित वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. डॉक्टर्स डिव्हाईन कर्म व्हेटर्नरी पॉलीक्लिनिक, हिलिंग युनिव्हर्सल आणि उज्ज्वल भारत संस्था यांच्यातील ५० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. कर्नल राणा, लतीफ मुलाणी आणि बर्मन यांची उपस्थिती होती. टाटा मोटर्स विंगर विभागाचे प्रमुख संजय वाघचौरे, सीएसआर विभागाचे प्रमुख रोहित सरोज यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकांचा सन्मान करण्यात आला. मनोज गाडगे, धनंजय शहाणे, सुनील कासार, विनायक चितळे, अजय धनवडे उपस्थित होते.

# वृद्धेचे हात-पाय बांधून सशस्त्र चोरट्यांनी लुटले

पिंपरी, दि. १३ (प्रतिनिधी) – वृद्ध महिला घरात एकटी झोपलेली असताना घरात घुसून चोरट्यांनी महिलेचे हात, पाय, तोंड बांधून तब्बल ६८ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने आणि इतर साहित्य असा एकूण ५३ लाख ७० हजारांचा ऐवज चोरून नेला. ही घटना मंगळवारी मध्यरात्री साडेबारा ते सव्वादोन या कालावधीत तळवडे येथील ज्योतिबानगरमध्ये घडली.

भारती मारुती भालेकर (वय ६०, रा. तळवडे) यांनी फिर्याद दिली आहे. तीन अनोळखी चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चिखली ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजित जाधव यांनी याबाबत माहिती दिली. भारती यांची जागा एका कंपनीला भाड्याने दिली आहे. तसेच, त्यांच्या काही खोल्या भाड्याने दिल्या आहेत. या भाड्याच्या पैशांवर भालेकर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. घराच्या वरच्या मजल्यावर भारती या एकट्या राहतात. तर, खालच्या मजल्यावर त्यांचा मुलगा आणि सून राहतात. भारती या सोमवारी रात्री पहिल्या मजल्यावरील हॉलचा दरवाजा बंद करून बेडरूममध्ये झोपल्या होत्या. भारती यांच्या घराच्या मागील बाजूला एक कंस्ट्रक्शन साईट सुरू आहे. त्या साईटवरून चोरटे भारती यांच्या घराच्या गच्चीवर आले.

मध्यरात्री साडेबारा वाजता तीन चोरटे हॉलचा दरवाजा तोडून घरात घुसले. चोरट्यांनी भारती यांच्या अंगावर बसून त्यांचे हात, पाय बांधले. मारहाण करून चाकूची भीती दाखवली. घरातून ४८ लाख २५ हजार रुपये किमतीचे ६८ तोळे सोन्याचे दागिने, पाच लाख रुपयांची रोकड, ३० हजारांचे चांदीचे दागिने, १० हजारांचा मोबाईल आणि पाच हजारांचे घड्याळ असा ५३ लाख ७० हजारांचा ऐवज लुटला. त्यानंतर भारती यांचे हात-पाय बांधले आणि तब्बल दोन तासांनंतर अडीचच्या सुमारास चोरट्यांनी पळ काढला.

■ वृद्धेला लुटलेले तीन चोरटे २८ ते ३५ वयोगटातील असून ते हिंदी भाषेत बोलत होते. साडेबारा वाजता घरात घुसल्यानंतर तब्बल दोन तास ते घरात होते. घटनास्थळापासून काही अंतरावरील एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यात तीन चोरटे पायी जाताना दिसत आहेत. त्यावरून त्यांचा माग काढला जात आहे, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजित जाधव यांनी सांगितले.

# कचरा प्रक्रिया केंद्रांच्या आराखड्याला मुहूर्त

## घनकचरा व्यवस्थापनासाठी हालचाली

पिंपरी, दि. १३ (प्रतिनिधी) – पिंपरी-चिंचवड शहरातील कचरा प्रश्न सोडविण्यासाठी विविध दहा ठिकाणी अत्याधुनिक कचरा प्रक्रिया केंद्र महापालिका उभारणार आहे. दुर्गंधीमुक्त केंद्रांसाठी जागा निश्चित केल्या आहेत. त्यांचे सविस्तर प्रकल्प आराखडे (डीपीआर) तयार करण्याचे काम सुरू आहे. शहरातील नागरिकांच्या आरोग्यासाठी आणि मोशी कचरा डेपोवरील ताण कमी करण्यासाठी लवकरात लवकर प्रक्रिया प्रकल्प उभा करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.

मोशी कचरा डेपोतील आठ जुलै रोजी कचऱ्याचा डोंगर 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कोसळून नऊ कामगारांचा मृत्यू झाला. तर १२ जण जखमी झाले. या दुर्घटनेनंतर काही दिवस डेपो बंद होता. तसेच डेपोत कचरा टाकणेही बंद होते. त्यामुळे शहरात कचऱ्याची गंभीर समस्या निर्माण झाली होती. सद्य:स्थितीत कचरा उचलला जात असला तरी अजूनही शहरातील विविध भागात कचऱ्याचे ढीग दिसून येत आहे. मोशी डेपोवरील ताण कमी करण्यासाठी शहराच्या विविध भागांत कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारावेत, अशी मागणी नगरसेवकांनी वेळोवेळी केली आहे. त्यामुळे शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर त्याच भागात प्रक्रिया करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने ठेवला आहे. त्यासाठी दहा क्षेत्रीय कार्यालयस्तरांवर सुमारे ४० जागा बघितल्या होत्या. त्यातील दहा जागा निश्चित केल्या आहेत.

घनकचरा व्यवस्थापन प्रभावी, विकेंद्रित पद्धतीने करण्यासाठी आणि मोशी कचरा डेपोवरील कचऱ्याचा वाढता भार कमी करण्यासाठी, प्रभाग स्तरावर घनकचरा व्यवस्थापनाची यंत्रणा सक्षम करण्यासाठी आणि कचऱ्याचे प्रभागनिहाय विकेंद्रीकरण करण्यासाठी कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. यासाठी प्रभाग १३ मध्ये निगडी प्राधिकरण सेक्टर क्रमांक २२, प्रभाग १७ मध्ये चिंचवडमधील आरक्षण १/८९, प्रभाग १८ मध्ये चिंचवडमधील आरक्षण क्रमांक २२१, प्रभाग १० मधील दत्तनगर, दिघीतील सर्व्हे क्रमांक ७७, चोविसावाडीतील आरक्षण क्रमांक २/१६, पुनावळेतील सर्व्हे क्रमांक २३ व २६ मधील काही भाग, गवळीमाथा, खडकी कॅण्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील कासारवाडीतील जागा या दहा जागा निश्चित केल्या आहेत.

" अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दुर्गंधविरहित ट्रान्स्फर स्टेशन, मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी, बायोगॅस, बायोफ्युएल, प्लॅस्टिकपासून उपयुक्त उत्पादने तयार करण्यासंदर्भातील विविध प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. प्रत्येक जागेची तांत्रिक व व्यवहार्यता तपासणी करून डीपीआर तयार करण्याचे काम सुरू आहे.

– **कुलदीप जंगम**, अतिरिक्त आयुक्त, महापालिका

### असे आहे नियोजन

■ प्रस्तावित दहा जागांवर क्षेत्रफळानुसार विविध प्रकारच्या घनकचरा प्रक्रिया सुविधा विकसित करणे, कचऱ्याचे वर्गीकरण व पुनर्वापर, ऊर्जानिर्मिती करणे, जैविक कचऱ्यापासून बायोगॅस व बायोफ्युएल निर्मिती करणे, प्लॅस्टिक कचऱ्यापासून विविध उत्पादने तयार करण्याचे महापालिका प्रशासनाचे नियोजन आहे.

# पिंपळे सौदागर येथे टोळक्याची दहशत

पिंपरी, दि. १३ (प्रतिनिधी) – चहाच्या टपरीजवळ टोळक्याने कोयते आणि लाकडी दांडक्यांनी हल्ला करत तिघांना जखमी केले व परिसरात दहशत माजवली. ही घटना शुक्रवारी (दि. ९) रात्री साडेआठच्या सुमारास पिंपळे सौदागर येथे रोझ आयकॉन सोसायटीसमोर एचडीएफसी बँकेजवळ घडली.

यशवंत राजाराम सूर्यवंशी (वय ३१, रा. शास्त्रीनगर, पिंपरी, मूळ रा. देवणी, जि. लातूर) यांनी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. संतोष उर्फ दाद्या नरवटे (रा.

## तिघांवर हल्ला

भाटनगर, पिंपरी) असे अटक आरोपीचे नाव आहे. विजय रतन कोल्हे (रा. रहाटणी) आणि इतर सात अनोळखी आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून, आरोपी संतोष नरवटे याला अटक करण्यात आली आहे. फिर्यादी मित्रांसह चहा पिण्यासाठी गेले असता, आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून 'तू आमच्या विजय कोल्हे मामाच्या नादी लागतो का' असे म्हणत फिर्यादी आणि त्यांच्या मित्रांना मारहाण केली. एका आरोपीने कोयत्याने फिर्यादीच्या कपाळावर मारून जखमी केले. तसेच, हवेत शस्त्रे फिरवून 'आम्ही इथले भाई आहोत' असे ओरडत दहशत निर्माण केली. सहायक पोलीस निरीक्षक माळगावे तपास करीत आहेत.



■ पिंपरीकडून निगडीकडे जाणाऱ्या ग्रेड सेपरेटर रस्त्यावर संरक्षक लोखंडी जाळी तुटल्याने या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता आहे.

# करदात्यांचा पाच लाखांचा विमा महापालिकेने काढावा

**शिवसेनेची मागणी**

पिंपरी, दि. १३ (प्रतिनिधी) – शहरातील सर्व मालमत्ता कर भरणाऱ्या नागरिकांच्या कुटुंबाचा पाच लाख रुपयांचा विमा काढावा. तसेच हद्दीतील नागरिकांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या अंत्यविधीचा खर्च महापालिकेने करावा, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहर प्रवक्ते रावसाहेब थोरात यांनी केली आहे.

थोरात यांनी महापौर रवि लांडगे यांना निवेदन दिले आहे. त्या निवेदनात म्हटले आहे की, शहरामध्ये दररोज विविध कारणांनी निसर्गनियमाप्रमाणे नागरिकांचे मृत्यू होत असतात. परंतु, एखाद्या घरात दुर्दैवी घटना घडल्यास त्या कुटुंबीयांना मोठा आर्थिक बोजा सहन करावा लागतो. अंत्यविधी, सावडणे, दशक्रिया, तेरावा व प्रथम पुण्यस्मरण असे विधी कुटुंबाला करावे लागतात. अशा विधींना साधारण एक ते दोन लाखांपर्यंत खर्च येतो. तसेच त्या कुटुंबावरती कर्ता स्त्री, पुरुष गेल्याने आर्थिक संकट ओढवते. राष्ट्रीयकृत बँकेमध्ये मयत व्यक्तीने एआयएम कार्ड वापरले असेल तर सदर बँक त्याच्या कुटुंबीयांना २ ते ५ लाखांचा विमा फक्त कार्ड वापरले म्हणून कार्डधारकाच्या कुटुंबाला २ ते ५ लाखांचा विमा देते. त्यामुळे मिळकतधारक दरवर्षी न चुकता महापालिकेला कर भरतात. मिळकतधारक व्यक्ती गेल्यास महापालिकेने मिळकतधारकाच्या वारसांना ५ लाखांचा विमा द्यावा. तसेच अंत्ययात्रेचा सर्व खर्च महापालिकेने मोफत करावा. यासाठी प्रत्येक वैकुंठभूमीमध्ये अंत्यविधीचे साहित्य महापालिकेने मोफत उपलब्ध करावे, अशी मागणी थोरात यांनी केली आहे.

# अन् दुसरेच निवडून येतात! – शर्मिला ठाकरे

जेजुरी, दि. १३ (सा.वा.) – कामे सांगायला लोक आपल्याकडे येतात, कामे आपण करतो; पण ज्ञानेश कुमार यांच्या कृपेने दुसरेच निवडून येतात, अशी टीका शर्मिला ठाकरे यांनी केली.

मनसेचे तालुकाप्रमुख उमेश जगताप व रवींद्र चिंबळकर यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या वेळी मनसे राज्य सरचिटणीस रिटा गुप्ता, जानकी सरदेसाई, जिल्हाध्यक्ष पोपट सूर्यवंशी, महेश पटेल, मकरंद पाटे, संतोष जुवेकर, जयदीप बारभाई, गणेश निकुडे, संदीप जगताप, शिवराज झगडे आदी उपस्थित होते.

# पीएमआरडीएमध्ये उद्योगांसाठी 'फॅसिलिटेशन सेंटर'

## परवानगी प्रक्रिया अधिक सुलभ होणार

पिंपरी, दि. १३ (प्रतिनिधी) – पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील औद्योगिक विकासाला गती देण्यासह उद्योजकांना भेडसावणाऱ्या तांत्रिक व प्रशासकीय अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी 'पीएमआरडीए'च्या वतीने विशेष 'फॅसिलिटेशन सेंटर' सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे औद्योगिक प्रस्तावांवरील कार्यवाही अधिक गतिमान, सुलभ आणि पारदर्शक होणार आहे.

पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली 'पीएमआरडीए'च्या आकुर्डी येथील मुख्यालयात औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंगळवारी (दि. १३) महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजूलक्ष्मी तसेच, चाकण, हिंजवडी, रांजणगाव, तळेगाव, पिरंगूट आणि इतर औद्योगिक क्षेत्रांतील संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत विकास परवानगी, फायर एनओसी, बीपीएमएस प्रणालीतील अडचणी, शुल्क आकारणी, आवश्यक कागदपत्रे, झोनिंग ओपिनियन आणि विविध प्रलंबित औद्योगिक प्रस्तावांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

औद्योगिक क्षेत्रांतील पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवरही बैठकीत चर्चा झाली. औद्योगिक परिसरातील वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था आणि मूलभूत सुविधांचा अभाव याकडे संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी लक्ष वेधले. प्राधान्याने सुधारणा करावयाच्या रस्त्यांची यादी औद्योगिक संघटनांकडून मागविण्यात आली आहे. तसेच, अवजड वाहनांसाठी 'ट्रक टर्मिनस' उभारणे आणि औद्योगिक क्षेत्रात अग्निशमन केंद्र उभारण्यासाठी आवश्यक जागा निश्चित करण्याचे निर्देशही महानगर आयुक्तांनी या बैठकीत दिले.





# वेंकटेश बिल्डकॉनने दहा हजार घरांचे उद्दिष्ट ठेवावे

## सतीश मगर यांचे गौरवोद्गार

पुणे, दि. १३ (प्रतिनिधी) – विश्वास, गुणवत्ता आणि उत्कृष्ट बांधकामाची परंपरा जपत पुण्याच्या बांधकाम क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या 'वेंकटेश बिल्डकॉन'ने अवघ्या २५ वर्षांत सहा हजारहून अधिक घरांची निर्मिती केली. आता वेंकटेश बिल्डकॉनने 'सेरेनिक' आणि इतर प्रकल्पांच्या माध्यमातून दहा हजार घरांचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून काम करावे, असे आवाहन मगरपट्टा टाऊनशिप प्रकल्पाचे चेअरमन आणि 'क्रेडाई'चे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मगर यांनी काढले.

वेंकटेश बिल्डकॉनच्या बावधन येथील चांदणी चौकाजवळ उभारण्यात येणाऱ्या 'वेंकटेश सेरेनिक' या नवीन निवासी प्रकल्पाचा शुभारंभ आणि सेल्स ऑफिसचे उद्घाटन सतीश मगर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रकल्पाच्या माहितीपुस्तिकेचेही अनावरण करण्यात आले. आमदार भीमराव तापकीर, आमदार शंकर मांडेकर, आमदार किरण सामंत, अतुल बेनके, कुमार गोसावी, चंद्रकांत मोकाटे, दिलीप वेडेपाटील, अल्पना वर्पे, रुपाली पवार, विराज भरणे, मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशनचे संस्थापक एस. आर. कुलकर्णी, उमेश पाटील, वेंकटेश बिल्डकॉनचे सीएमडी अंकुश आसबे, लहूराज आसबे, अरुण राजवाडे, हेमंत गोसावी आदी उपस्थित होते.

याप्रसंगी 'वेंकटेश सेरेनिक' प्रकल्पात पहिल्या बुकिंग करणाऱ्या पाच ग्राहकांचा उपस्थितांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संचालक अरुण राजवाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. जे. अक्षय यांनी केले.

# फीडर पॉइंट हटविण्याची घोषणा हवेतच

पुणे, दि. १३ (प्रतिनिधी) – कचऱ्याचे ढीग हटविण्यासाठी फीडर पॉइंट बंद करण्याची घोषणा झाली; मात्र ती प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक घंटागाड्याच पुणे पालिकेकडे नसल्याचे समोर आले आहे. उपलब्ध वाहने आणि शहराची गरज यांचा ताळमेळ न बसल्याने कचरा संकलनाच्या यांत्रिकीकरणाचा प्रस्ताव रखडला आहे. प्रशासनाने सध्या जुन्याच पद्धतीने कचरा उचलण्याचा निर्णय कायम ठेवला आहे.

महापालिका आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर नवलकिशोर राम यांनी शहरातील विविध भागांत अचानक पाहणी केली होती. कचरा जमा करण्यासाठी निश्चित केलेले फीडर पॉइंटच कचऱ्याचे अड्डे बनल्याचे दिसून आल्याने आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली होती. हे पॉइंट हटवून यांत्रिक पद्धतीने कचरा संकलित करायचा आणि थेट प्रक्रिया प्रकल्पांपर्यंत पोहोचवायचा, अशी योजना जाहीर करण्यात आली. परिमंडळ एकमध्ये त्याचा प्रयोगही सुरू झाला. मात्र, घोषणेनंतर प्रत्यक्ष अंमलबजावणीचे गणित मांडताना प्रशासनाची अडचण उघड झाली. शहरातील १८ लाख घरे आणि सोसायट्यांमधून कचरा उचलण्यासाठी सुमारे १,८०० घंटागाड्यांची आवश्यकता आहे. पालिकेकडे उपलब्ध गाड्यांची संख्या मात्र ८०२ आहे. म्हणजेच गरजेच्या तुलनेत निम्म्याहून कमी गाड्या उपलब्ध असून, आणखी ९९८ गाड्यांची तूट आहे.

### घोषणेचे गणित फसले!

■ घरे/सोसायट्या : १८ लाख
■ एका घंटागाडीची दैनिक क्षमता : सरासरी १,००० घरे
■ आवश्यक घंटागाड्या : १,८००
■ उपलब्ध घंटागाड्या : ८०२
■ तूट : ९९८ गाड्या

# ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्यासाठी पिंपरीत मनसेतर्फे सह्यांची मोहीम

## आयोगाच्या कारभारावर आक्षेप

पिंपरी, दि. १३ (प्रतिनिधी) – निवडणूक आयोगाचे आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सोमवारी पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात सह्यांची मोहीम राबविण्यात आली.

निवडणूक आयोगाच्या कारभारावर आक्षेप घेत मनसेने ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. या मागणीला पाठिंबा दर्शविण्यासाठी सह्यांची मोहीम राबविण्यात आली. यावेळी उपस्थितांनी सह्या करून मोहिमेला पाठिंबा दिला. मनसेच्या या आंदोलनातून निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात करण्यात आली.

मनसेचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सचिन चिखले यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम पार पडली. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख चेतन पवार, रुपेश पटेकर, राजू अवसरे, बाळा दानवले, रोमी सिंधू, अक्षय शिंदे, तुषार सोनटक्के, सागर बहुले, प्रमोद अडसुळे आदी उपस्थित होते.

# चिंचवडमध्ये 'शून्य कचरा कार्यालय' उपक्रमाचा प्रारंभ

## अतिरिक्त आयुक्त जंगम, बगाडे यांच्या हस्ते उद्घाटन

पिंपरी, दि. १३ (प्रतिनिधी) – महापालिकेच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाने 'शून्य कचरा कार्यालय' या उपक्रमाची सुरुवात केली आहे. पिंपरी-चिंचवडसारख्या झपाट्याने विकसित होणाऱ्या शहरात कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे हे मोठे आव्हान आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक कार्यालयाने स्वत:च्या स्तरावर अशा पद्धतीने पुढाकार घेऊन कचऱ्याचे वर्गीकरण आणि योग्य विल्हेवाट लावण्यास सुरुवात केल्यास या आव्हानावर मात करण्यास मदत होईल, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी व्यक्त केले.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वर्धापनदिनानिमित्त चिंचवड येथील झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाच्या मुख्य कार्यालयात 'शून्य कचरा कार्यालय' या उपक्रमाचा शुभारंभ अतिरिक्त आयुक्त जंगम आणि विक्रांत बगाडे यांच्या हस्ते



करण्यात आला. कचरा व्यवस्थापन प्रभावी करण्यासह कचऱ्याचे वर्गीकरण, योग्य विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्तांनी कौशल्यम लाईट हाऊस प्रकल्पालाही भेट देऊन तेथील प्रशिक्षण उपक्रमांची पाहणी केली. यावेळी उपायुक्त अण्णा बोदडे, सहायक आयुक्त दशरथ कांबळे, कार्यकारी अभियंता शेखर गुरव, आसरा फाऊंडेशन अध्यक्षा अर्चना मोरे, कौशल्यम लाईट हाऊस प्रकल्प व्यवस्थापक अमृता बहुलेकर, दत्ता हेंद्रे, वैभव नसुरडे, आशिष कुंभलकर आदी उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे म्हणाले, महापालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये 'शून्य कचरा कार्यालय' ही संकल्पना राबविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

उपायुक्त अण्णा बोदडे म्हणाले, कचरा व्यवस्थापनाची सुरुवात स्वत:पासून करून दैनंदिन कामकाजात कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, पुनर्वापर आणि विलगीकरणाची सवय अंगीकारावी, अशा सूचना सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या.

### 'शून्य कचरा कार्यालय' म्हणजे नेमके काय?

■ कार्यालयात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, पुनर्वापर आणि पुनर्प्रक्रिया करून अंतिम विल्हेवाटीसाठी पाठवल्या जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमीत कमी ठेवणे, हा 'शून्य कचरा कार्यालय' या संकल्पनेचा मुख्य उद्देश आहे. महापालिकेच्या झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाच्या मुख्य कार्यालयात या उपक्रमांतर्गत कचरा वर्गीकरणासाठी स्वतंत्र डब्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये काच संकलन, रद्दी पेपर संकलन, धातू संकलन, स्वच्छ पॉलिथिन संकलन, स्वच्छ प्लॅस्टिक संकलन आणि ई-कचरा संकलनासाठी स्वतंत्र डबे ठेवण्यात आले आहेत.